जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष आदरणीय माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून सी के टी इंग्रजी माध्यमिक विभागाने विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित मॅरेथॉन तसेच पालकांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा आज दिनांक 4/10/25 रोजी आयोजित करण्यात आला .या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या सौ. वर्षाताई ठाकूर, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षा सौ.प्रिया काशिद , सहसचिव सौ.स्नेहल सूर्यवंशी, इंग्रजी प्राथमिक च्या मुख्याध्यापिका सौ. नीलिमा शिंदे मॅडम, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका सौ वैशाली पारधी मॅडम, मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर, पर्यवेक्षिका सौ नीरजा अदुरी मॅडम हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळेचे मुख्याध्यापक श्री.संतोष चव्हाण सर यांनी शाळेच्या आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा, शाळेच्या उत्तम कामगिरीचा तसेच आदरणीय रामशेठ ठाकूर साहेबांच्या अतुलनीय कार्याचा उल्लेख आपल्या प्रास्ताविकात केला.

"रामशेठ ठाकूर साहेब रायगड चे एक आदर्श व्यक्तिमत्व " याविषयी आपल्या भाषणातून सांगताना विद्यालयाच्या शिक्षिका सौ चैताली सुर्वे यांनी साहेबांचे एक उत्तम माणूस, सर्वांची मायेने काळजी घेणारा, एका भक्कम कल्पवृक्षप्रमाणे दानी या पैलूंची ओळख करून दिली.

यावेळी इंग्रजी आणि गणित मॅरेथॉन स्पर्धेतील तसेच रांगोळी स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्रे आणि चषक देऊन गौरविण्यात आले.

विजेत्या स्पर्धकांची नावे :

गणित मॅरेथॉन :

1) वैभव प्रमोद भारती - श्री.बापूसाहेब डी डी विसपुते प्रायमरी इंग्लिश स्कूल, दिवस, विचुंबे

2) ईशी दुबे विनयप्रकाश - रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ,खारघर

3) वंशिका बोरकर - न्यू होरायझन स्कूल , खांदा कॉलनी , नवीन पनवेल

इंग्रजी मॅरेथॉन :

1) मान्यता अनुमोलू - रामशेठ ठाकुर पब्लिक स्कूल,खारघर

2) संजना राजू चौधरी - एम एन आर, इंटरनॅशनल स्कूल

3) ईश्वरी उमेश खाडे - सी. के.ठाकूर इंग्लिश सेकंडरी स्कूल, नवीन पनवेल

रांगोळी स्पर्धेचे विजेते :

1) सौ. रुपाली जयेंद्र पेटकर

2) सौ. दक्षता यतीन पाटील

3)सौ. श्रद्धा तांबोळी

सदर स्पर्धेचे परीक्षक श्री.मंगेश खुटारकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्पर्धक पालकांचे आणि ही स्पर्धा आयोजित केल्याबद्दल शाळेचे ही भरभरून कौतुक केले.

संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या सौ. वर्षाताई ठाकूर यांनी आपल्या भाषणातून आदरणीय श्री.रामशेठ ठाकूर साहेबांच्या गुणी, दानी आणि हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचे वर्णन करून ,त्यांच्याबद्दलचा आदर आपल्या सर्वांच्या मनात होता, आहे आणि कायम राहील हे नमूद केले. तसेच "नारीशक्तीचा जागर" या विषयावर आधारित विविध आकर्षक आणि सुंदर रांगोळी पालकांनी काढल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. हा उत्तम कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल शाळेचे ही कौतुक केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व विजेत्या पालकांचे त्यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.प्राची इसे यांनी केले.या कार्यक्रमासाठी गायत्री पाटील मॅडम, श्री .महेश पोपेटा, सौ. स्नेहा पाटील,संगीत शिक्षक श्री.रुपेश मढवी, तबला वादक श्री.खरे सर, या शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

सहभागी व विजेत्यांचे प्रमाणपत्र आपल्या उत्तम हस्ताक्षरात सौ. चैताली सुर्वे यांनी लिहिले. आभारप्रदर्शन सौ.सरोज जितेकर मॅडम यांनी केले.

कार्यक्रम अतिशय सुंदर रीतीने पार पाडल्याबद्दल मुख्याध्यापकानी सर्वांचे कौतुक केले .




CHANGU KANA THAKU
VIDYALAYA, NEW PANVEL.
English Medium - Secondary Section
Celebrating with Gr
ond Jubilee Year
of
Shri. Ramsheth Thak
Changu Kana Thakur Vid
II Prize


ANGU KANA THAKUR
VIDYALAYA, NEW PANVEL.
English Medium - Secondary Section
Changu Kana Thakur Vidyalaya
I Prize
II Prize
III Prize